# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.07.2025** **वार-बुधवार**

---

**आवाहन**

विकसित महाराष्ट्र-2047 या सर्वेक्षणामध्ये नागरिकांना सहभागी होण्याचं आवाहन विभागीय आयुक्त डॉक्टर चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केलं आहे. त्यामध्ये 'जमीन' या विषयावर नागरिकांनी आपले अभिप्राय 17 जुलैपर्यंत एका गुगलशीटमध्ये भरुन पाठवायचे आहेत. 'जमीन' विषयाच्या अनुषंगानं 8 प्रश्न असून इंग्रजी आणि मराठी भाषेमध्ये त्यांची उत्तरं देता येतील.

**कामगार**

केंद्र सरकारनं मागील दहा वर्षात 169 हून अधिक श्रेणीतील कामगारांसाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. आज देश चालवणारे आणि देश बनवणारे श्रमिक आहेत यामुळंच केंद्र सरकार श्रमिकांच्या हिताचं काम करत असल्याचं प्रतिपादन भारतीय जनता मजदूर सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष अर्णब चॅटर्जी यांनी आज पुण्यात केलं. ओळखपत्र आणि सभासद कार्डचं वितरण आणि ई-श्रमिक कार्डची नोंदणी या कार्यक्रमात चॅटर्जी बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते राज्यातील विविध शहरातून आलेल्या शंभराहून अधिक पदाधिकाऱ्यांना ओळखपत्रांचं वाटप आणि ई-श्रमिक कार्डची नोंदणी तसंच सभासदांना सदस्य प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. लवकरच  घरगुती कामगार महिला, रिक्षाचालक यांच्यासह असंघटित कामगारांचा समावेश करण्यात येणार आहे. एसटी महामंडळानं अचानक सेवा समाप्त केलेल्या हमालांनी यावेळी त्यांच्या समस्या सांगितल्या.

**बंद**

केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाच्या निषेधार्थ आज पुकारलेल्या देशव्यापी संपाचे पडसाद पुण्यातही उमटले. बँका, टपाल खाते, प्राप्तिकर विभाग, महावितरण, बीएसएनएलसह विविध आस्थापनांच्या कामगारांनी दिवसभराच्या संपात सहभाग घेतला त्यामुळं या सेवांवर परिणाम झाला.

**डेंग्यू**

डेंग्यू विषाणूच्या डेनव्ही-2 या गंभीर प्रकाराचं अस्तित्व 65 ते 70 टक्के नमुन्यांमध्ये आढळल्याचं नुकत्याच झालेल्या एका अभ्यासातून समोर आलं आहे. या प्रकारामुळं रुग्णांमध्ये गंभीर लक्षणं आणि रुग्णालयात दाखल होण्याचं प्रमाण जास्त आहे. बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि पुणे नॉलेज क्लस्टर फाउंडेशन यांनी आत्तापर्यंत सुमारे 5,000 डेंग्यू नमुन्यांची तपासणी केली आहे. त्यामध्ये डेंग्यू सिरोटाईप - 2 हा प्रकार सर्वाधिक आढळला आहे. हा अभ्यास लसीचा विकास आणि स्वस्त निदान चाचणी तयार करण्यासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देईल असं सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी सांगितलं.

**फिरणारी मुले**

रस्त्यावर फिरणाऱ्या मुलांना समाज आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचं पुनर्वसन करण्यासाठी शासनानं 'मिशन वात्सल्य' हाती घेतलं असून, त्या अंतर्गत 29 महानगरपालिका क्षेत्रांमध्ये 31 फिरती पथकं सुरू करण्यात येत आहेत. चार महिन्यांत या प्रकल्पाला अत्यंत प्रेरणादायी प्रतिसाद लाभला. या प्रकल्पाद्वारे नाशिक, पुणे, मुंबई शहर, ठाणे आणि नागपूरमधील 3 हजार 800 हून अधिक मुलांना शैक्षणिक, मनोरंजन, आहार, तसंच आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात आल्या.

त्यामुळे ती मुलं शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आल्याचं निदर्शनास आलं असं महिला आणि बालविकास विभागाचे कार्यक्रम व्यवस्थापक योगेश जवांदे यांनी सांगितलं.

**वाहतूक**

भूसंपादनाअभावी शहरातील अनेक रस्त्यांचं रुंदीकरण रखडल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी; कृती दल स्थापना करण्याचा निर्णय पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी घेतला आहे. कात्रज-कोंढवा रस्त्याचं रुंदीकरण, कोथरूड विधानसभा मतदारसंघातील अर्धवट असलेली 'मिसिंग लिंकची कामं भूसंपादनाअभावी रखडली आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत सक्तीच्या भूसंपादनाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यात आला.

**शिल्प**

पुण्यातील बावधन परिसरात 'हिंदवी स्वराज्यनिर्मिती शिल्प' अंतर्गत 20 फूट उंचीच्या चौथऱ्यावर 60 फूट उंच छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती कास्य पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी 29 कोटी रुपयांच्या पुर्वगणनपत्रकाला अंदाज समितीनं मान्यता दिली आहे.

**ब्लेड्स**

पुण्यातील ब्लेड्स ऑफ ग्लोरी क्रिकेट संग्रहालय आणि मध्यप्रदेश क्रिकेट असोसिएशन यांच्याद्वारे इंदूरच्या होळकर क्रिकेट मैदानावर ब्लेड्स ऑफ ग्लोरी क्रिकेट संग्रहालयाची शाखा सुरु केली आहे. या संग्रहालयात नामवंत क्रिक्रेटपटूंनी वापरलेल्या 500 क्रिकेटच्या वस्तूंचा समावेश असून यापैकी 400 वस्तू या ब्लेड्स ऑफ ग्लोरीनं उपलब्ध करून दिल्या आहेत.

**पाणी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत सुमारे वीस टीएमसी म्हणजे 68 टक्के पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 25 टक्के होता. खडकवासला धरणातून आतापर्यंत अंदाजे पाच टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**